दिनांक १३/१२/२०१८

# :: प्रेस नोट ::

## तालुका कृषि अधिकारी कार्यालय धर्माबाद ता.धर्माबाद येथील कृषि सहायक मुरलीधर गंगाधर चटलावार यांना २,५००/—रूपयाच्या लाचेच्या रक्कमेसह नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडले.

तक्रारदार यांनी दिनांक १२/१२/२०१८ रोजी पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय नांदेड येथे तक्रार दिली की, " त्यांचे शेतीसाठी शेडनेट हाउसचा प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी नांदेड यांचेकडे सादर करण्यासाठी कृषि सहायक चटलावार यांनी २,५००/—रूपये लाच मागत आहेत" वगैरे तक्रारदार यांनी तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून दिनांक १३/१२/२०१८ रोजी तालुका कृषि अधिकारी कार्यालय धर्माबाद ता.धर्माबाद परिसरात पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचे शेतीसाठी शेडनेट हाउसचा प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी नांदेड यांचेकडे सादर करण्यासाठी कृषि सहायक चटलावार यांनी ३,०००/—रू.लाचेची मागणी करून तडजोडीअंती २५००/—रूपये लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

दिनांक १३/१२/२०१८ रोजी तालुका कृषि अधिकारी कार्यालय धर्माबाद ता.धर्माबाद परिसरात लावण्यात आलेल्या सापळयामध्ये आरोपी लोकसेवक चटलावार यांनी तक्रारदार यांचे नमुद कामासाठी २,५००/— लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणी पोलीस स्टेशन धर्माबाद जि.नांदेड येथे आरोपी लोकसेवक मुरलीधर गंगाधर चटलावार, वय ३० वर्ष, पद रोजगार कृषि सहायक नेमणुक तालुका कृषि अधिकारी कार्यालय धर्माबाद ता.धर्माबाद जिल्हा नांदेड यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध (संशोधन) अधिनियम २०१८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

तरी सर्व नागरीकांना अवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रमांक :— १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रमांक ०२४६२—२५३५१२

३) श्री विजय डोंगरे, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रमांक ८९७५७६९९९८

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

( विजय डोंगरे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.

कार्यालय,पोलीस उप अधिक्षक
ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र